**प्रेस नोट दिनांक १६/०७/२०१९**

**खडक पोलीस ठाणे, पुणे शहर**

**फेसबुकवर महिलांना अश्लील फोटो, मेसेज, व लैगींक संबंधाची मागणी करणा⊡्या विकृत गुन्हेगाराला अटक**

सदर बाबत अधिक माहिती अशी की, दिनांक १४/३/२०१९ रोजी प्रोफाईल नेम - **Mansi Nimbalkar** या बनावट नावाचे **URL-** या सोशल मिडीयावरील अकाऊंटचा वापर करुन कोणीतरी अज्ञात इसमाने दाखल गुन्हयातील फिर्यादी व इतर महिलांना त्यांचे सोशल मिडीयावरील या फेसबुक अकाऊंट वापरण्यावर बारकाईने लक्ष ठेवुन सतत अश्लिल व्हिडीओ कॉल तसेच फिर्यादीचे व इतर महिलांचे लग्नाचा मॉर्फिंग केलेला अश्लिल फोटो, अश्लिल मेसेज, इतर अश्लिल फोटो पाठविले व फिर्यादी व इतर महिलांना यांना लैंगिक संबंधाची मागणी करुन, फिर्यादीचे व इतर महिलांचे मनास लज्जा उत्पन्न होवुन फिर्यादीची व इतर मानसिक स्थिती बिघडवली म्हणुन अज्ञात इसमाविरुद्ध तक्रार दिलेने खडक पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं २९४/२०१९, भादवि कलम ३५४(अ)(ड), माहिती तंत्रज्ञान अधिनियम, सन २००० चे कलम ६७ प्रमाणे गुन्हा दाखल होता.

दाखल गुन्हयाचे संदर्भात सायबर पोलीस ठाणे पुणे शहर यांचेकडुन तांत्रिक मदत मागितली असता त्यांचेकडुन सदरचा नमुद अकाउंट हे इसम नामे निखिल ऊर्फ विक्की चंद्रकांत जाधव वय २४ वर्षे रा. प्लॅट नं १०, तिसरा मजला, शहनाई अपार्टमेंट, पोतदार शाळेमागे, तांबजाई नगर, सातारा याचे असलेबाबत माहिती प्राप्त झाली. त्याप्रमाणे तपास पथकाचे कर्मचारी पोहवा विनोद जाधव व पोकॉ रवि लोखंडे खडक पोलीस स्टेशन पुणे नमुद पत्त्यावर पाठविले असता, त्यास सदर ठिकाणाहुन ताब्यात घेण्यात आले आहे, त्याचेकडे दाखल गुन्हयाचे संदर्भात तपास करता त्याने गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास वरील गुन्हयात अटक करण्यात आली आहे, सदर गुन्हयाचा तपास श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे)खडक पोलीस स्टेशन पुणे हे करीत आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री. श्रीकांत तरवडे, अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग पुणे, श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.भरत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, सहा पोलीस निरीक्षक व पोलीस कर्मचारी विनोद जाधव, गणेश सातपुते, संदिप पाटील, महावीर दावणे, आशिष चव्हाण, नागेश पिसाळ, राकेश क्षिरसागर, समीर माळवदकर, बंटी कांबळे, प्रमोद नेवसे, रवी लोखंडे, इम्रान नदाफ, योगेश जाधव, विशाल जाधव, हिम्मत होळकर, यांचे पथकाने केली.

**( भरत जाधव )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर.